रायगड जिल्ह्यात वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट, ज्यूसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादना साठी तालुका निहाय वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
-: संपर्क :-
विहा एन्टरप्रायजेस
9004563266
8888570393

दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com

● वर्ष १७ वे ● अंक १८२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते ५ जी इंटरनेट सेवेचा शुभारंभ संपन्न

# पंतप्रधानांनी साधला रायगड जिल्ह्यातील पनवेल महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद

## पनवेल मनपाच्या शाळेत मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावरील कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ५ जी इंटरनेट सेवेचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पंतप्रधानांनी रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळा क्र.८ या शाळेतील विद्यार्थ्यांशी दूरदृष्यप्रणाली द्वारे संवाद साधला. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.**




यावेळी पंतप्रधानांनी आपल्या भाषणात भारतीय तंत्रज्ञान आपल्या देशाला ग्लोबल लीडर बनवेल, असा विश्वास व्यक्त करून ५ जी इंटरनेट सेवेचे महत्त्व सांगितले.



यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी हात हलवून आणि उभे राहून पंतप्रधानांना अभिवादन केले. मुख्यमंत्री आपल्यासारखेच बेंचवर बसल्याचे पाहून विद्यार्थ्यांना अप्रूप वाटले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद देखील साधला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, महेंद्र थोरवे, महेश बालदी, माजी खासदार रामशेठ ठाकूर, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, विभागीय आयुक्त (अ.का) तथा रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, गृहरक्षक-नागरी संरक्षण दल अपर पोलीस महासंचालक ब्रिजेश सिंह, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे संचालक गणेश पाटील, कोकण विभागाचे पोलीस महानिरीक्षक बिपिन कुमार सिंह, आयुक्त डॉ.जय जाधव, उपायुक्त शिवराज पाटील, पुरुषोत्तम कराड, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, प्रशासनातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, आदि उपस्थित होते.

५ जी इंटरनेट सेवेच्या पहिल्या टप्प्यात ही सेवा मुंबई, पुणे, दिल्ली, चेन्नई, कोलकत्ता, चंदीगड, गुरुग्राम, हैदराबाद, लखनऊ,गांधीनगर, अहमदाबाद व जामनगर या शहरांमध्ये सुरू होणार आहे. त्यानंतर संपूर्ण देशात हे ५ जी इंटरनेटचे जाळे विस्तारत जाणार आहे.

# जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष पदासाठी आरक्षण जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील सुमारे ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष पदासाठीचे आरक्षण आज जाहीर झाले. राज्यातील ग्रा. पंचायतींच्या, नगर पालिका आणि महापालिकांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आलेल्या असताना हे आरक्षण जाहीर झाले आहे. ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदा निवडणुकीबाबत महत्वाचा निर्णय घेतला आहे.

विविध जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगानं ग्रामविकास विभागाला मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याच्या सूचना दिल्या होत्या. आता, ग्रामविकास विभागानं जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीबाबत मोठा निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदांसाठी जिल्हा परिषद अध्यक्षपदाचं आरक्षण राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलं आहे. एकीकडे राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांची सुनावणी सुप्रीम कोर्टात प्रलंबित असताना दुसरीकडे ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणाबाबत राजपत्र प्रसिद्ध करण्यात आल्यानं येत्या काही काळात निवडणूक जाहीर होणार का याकडे ग्रामीण भागातील मतदाराचं लक्ष लागले आहे.

त्रिस्तरीय रचनेतील सर्वोच्च म्हणजेच जिल्हास्तरावर अस्तित्वात असणारी ग्रामीण प्रशासनातील प्रमुख संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाची आरक्षण सोडत शुक्रवार ३० सप्टेंबर रोजी ग्रामविकास विभागाने काढली आहे. जिल्हा परिषद अध्यक्षांचे आगामी अडीच वर्षासाठीचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

### जिल्हा परिषदांसाठी असे आहे आरक्षण...

ठाणे : सर्वसाधारण, पालघर : अनुसूचित जमाती, रायगड : सर्वसाधारण, रत्नागिरी :नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), सिंधुदुर्ग : सर्वसाधारण, नाशिक : सर्वसाधारण (महिला), धुळे : सर्वसाधारण (महिला), जळगाव : सर्वसाधारण, अहमदगर :अनुसूचित जमाती, नंदुरबार : अनुसूचित जमाती (महिला), पुणे : सर्वसाधारण, सोलापूर :नागरिकांचा मागास प्रवर्ग, सातारा : नागरिकांचा मागस प्रवर्ग (महिला), सांगली :सर्वसाधारण (महिला), कोल्हापूर : सर्वसाधारण (महिला), औरंगाबाद : सर्वसाधारण, बीड : अनुसूचित जाती, नांदेड : नागरिकांचा मागास प्रवर्ग, उस्मानाबाद : सर्वसाधारण (महिला), परभणी : अनुसूचित जाती, जालना : नागरिकांचा मागस प्रवर्ग, लातूर : सर्वसाधारण( महिला), हिंगोली : सर्वसाधारण (महिला), अमरावती : सर्वसाधारण (महिला), अकोला : सर्वसाधारण (महिला), यवतमाळ : सर्वसाधारण, बुलढणा : सर्वासाधारण, वाशिम : सर्वसाधारण, नागपूर अनुसूचित जमाती, वर्धा : अनुसूचित जाती (महिला), चंद्रपूर :अनुसूचित जाती (महिला), भंडारा : अनुसूचित जमाती (महिला), गोंदिया : नागरिकांचा मागस प्रवर्ग, गडचिरोली : नागरिकांचा मागस प्रवर्ग (महिला)

# पत्नीला ठार करून नवऱ्याने गळफास घेऊन आपले जीवन संपवले

**दै.रायगड नगरी । कर्जत**

**नेरळ पोलीस ठाणे हद्दीत नवरा बायकोच्या भांडणात नवऱ्याने पत्नीचा गळा कापून हत्या करून त्यानंतर स्वतः गळफास घेत आपले जीवन संपविले आहे. पूजा-पिंटू राम असे या मयत पती पत्नीचे नाव समोर आले आहे. तर धक्कादायक गोष्ट म्हणजे त्यांच्या लहान चिमुरड्या मुलांच्या डोळ्यासमोर हा प्रकार घडत होता. घटनास्थळी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच नेरळ पोलीस हजर झाली होती.**



कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या नेरळ पूर्व परिसरात राहणाऱ्या साई मंदिर येथील मोहितेंचि चाळ येथे एक जोडपे आपल्या दोन लहान मुलांसोबत भाड्याने राहत होते. आज शनिवार १ ऑक्टोबर सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास पूजा आणि पिंटू यांच्या दोघात जोरात भांडण सुरू झाले या झटापटीत पिंटूच्या शरीरावर कैचिचे टोक लागले गेलेले दिसत आहे तर पिंटूने पत्नी पूजाच्या गळ्यावर धारदार शत्राच्या साह्याने वार केल्याने पत्नी पूजा ही रक्ताच्या थारोळ्यात खाली पडली होती. पत्नी मृत झाल्याचे पाहून पिंटू ने देखील घरात गळफास घेत आपले जीवन संपविले होते. हे सर्व प्रकार घरात घडत असताना पूजा आणि पिंटूची चिमुरडी लहान मुले हे झोपेतून उठून डोळ्यासमोर पाहत होती.

.../२

# नैना प्रशासकीय अधिकाऱ्यांना परत धाडले

## शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल तालुक्यातील आदई येथे तोडक कारवाई करण्यासाठी आलेल्या नैना प्रशासनाला शेतकऱ्यांनी परतवून लावले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय झाला आहे.**



आदई येथे तोडक कारवाई करण्यासाठी आलेल्या नैनाचे अधिकारी आले होते. शेतकरी प्रकल्पग्रस्त उत्कर्ष समितीच्या सदस्यांनी आणि शेतकऱ्यांनी या अधिकाऱ्यांना परत धाडले. नैना नको हीच भूमिका या ठिकाणी आक्रमक शेतकऱ्यांनी मांडली. नैनाने शेतकरी बांधवांची अतिशय दयनीय परिस्थिती करून सोडली आहे. आपण जर एकजूट होऊन संघर्ष केला नाही तर शेतकरी नावाची प्रजाताच राहणार नाही. शेतकऱ्यांना संपवण्याची पूर्ण तयारी जणू या सरकारने केलेली आहे अशा भावना संतप्त शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केल्या. नैना प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती आणि आदई गावचे सरपंच रमाकांत गरुडे तसेच राजेश केणी सचिव नैना प्रकल्पबाधीत शेतकरी उत्कर्ष समिती व ग्रामस्थ यांच्या आक्रमक भूमिकेमुळे नैनाच्या अधिकाऱ्यांना परत जाण्यास भाग पडले आहे. यावेळी मोठ्या संख्येने पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

कोणत्याही परिस्थितीमध्ये नैना नको ही भूमिका या ठिकाणी घेऊन नैनाच्या वतीने गेल्या नऊ वर्षांमध्ये कोणत्याही प्रकारचा विकास झाला नसल्याचा आरोप करण्यात आला. हा अन्यायकारी प्रकल्प या ठिकाणी नको हीच भूमिका शेतकऱ्यांच्या असताना हा प्रकल्प आमच्यावर लादण्याचा प्रयत्न केला तर शेतकरी पेटून उठेल आणि संघर्षासाठी, आपल्या जमिनीसाठी, भाकरीसाठी मग दोन हात करायला शेतकरी मागे पुढे पाहणार नाही. अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. शेकाप तालुका चिटणीस राजेश केणी, नामदेवशेठ फडके, शेखर शेळके, बाळाराम फडके, जनार्दन शेळके, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच रमाकांत गरुडे, विलास शेळके, आकाश मोकल, दीपक शेळके, राज पाटील, विलास पाटील, अनंता रामदास पाटील, मनोहर पाटील, मनोहर शेळके, संदेश पाटील आदी विचुंबे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर कारची कंटेनरला पाठीमागून धडक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुबई पुणे एक्सप्रेस हायवेवर खान्देश्वर येथे एका हुंडई कारची कंटेनरला पाठीमागून धडक झालेल्या अपघातात सुदैवाने जीवितहानी टळली आहे मात्र कारचे मोठे नुकसान झाले आहे.

कर्नल इघ सक्सेना (वय ७१वर्षे, रा. हडपसर पुणे) हे आपल्या ताब्यातील हुंडई कार क्रं MH 12TN 5381 घेऊन पुणे वरून मुंबईकडे जात असताना खान्देश्वर परिसरात त्यांचा गाडीवरील ताबा सुटून त्यांनी तिसऱ्या लेन वरून जाणारा कंटेनर क्र MH 46-R4520 ला पाठीमागून धडक दिली. सदर अपघातामध्ये सुदैवाने कोणालाही दुखापत नाही मात्र कारचे मोठे नुकसान झाले आहे.



राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पनवेल येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे, यांच्यासह भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# उरण तालुक्यात हत्तीरोगाचे रुग्ण

## आरोग्य विभागाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । उरण**

हत्तीरोग हा डासांपासून मनुष्याला होणारा रोग आहे.अशा डासांची उत्पत्ती ही चाणजे, चिरनेर, मोठी जुई सह इतर ग्रामपंचायत हद्दीत होत असल्याने हत्तीरोगाचे रुग्ण याठिकाणी आढळून येत आहेत. तरी उरण तालुक्यात पसरत असलेल्या हत्तीरोगाला रोखण्यासाठी आरोग्य विभागाने ग्रामपंचायत स्तरावर शिबिरे राबवून डायथिलकाबीमाझिन (डीईसी) या गोळ्यांचे वाटप रुग्णांना करण्यात यावे अशी मागणी हत्तीरोग बाधित रुग्णांचे नातेवाईक मंडळी करत आहेत.

हत्तीरोग हा क्युलेक्स डासांपासून मनुष्याला होणारा रोग आहे. डास चावल्यानंतर हत्तीरोगाची लक्षणे ही ८ ते १२ महिन्यांनंतर दिसतात. यामध्ये रुग्णांचे पाय (अवयव) वूषण हे आकाराने जाड होतात व रुग्णांना हालचाल करणे अवघड होवून बसते. हत्तीरोगा वर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाच्या आरोग्य विभागाकडून १० वर्षांपूर्वी उरण तालुक्यात जनजागृती, सर्व्हे करण्यात आले होते. यावेळी चाणजे, चिरनेर, मोठे भोम परिसरात हत्तीरोगाचे रुग्ण आढळून आले होते. त्यावेळी आरोग्य विभागाकडून हत्तीरोग बाधित रुग्णांना मोफत (डीईसी) गोळ्यांचे वाटप करण्यात आले होते. त्यानंतर नूकताच आरोग्य विभागाकडून हत्तीरोग बाधित रुग्णांचे सर्व्हे करण्यात आले आहे. परंतु हत्तीरोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी डायथिलकाबीमाझिन (डीईसी) गोळ्यांचे वाटप करण्यात आले नसल्याची बाब हत्तीरोग बाधित रुग्णांकडून सांगण्यात येत आहे.तरी शासनाने उरण तालुक्यात हळूहळू पसरत असलेल्या हत्तीरोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य विभागाच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावर शिबिरे राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# स्त्री स्वातंत्र्याचे पुढचे पाऊल

गेले काही महिने न्यायव्यवस्था सातत्याने महिलांचे हक्क उचलून धरणारे, त्यांचे समाजातील पुरुषांच्या बरोबरीचे स्थान अधोरेखित करणारे आणि देशातील व्यवस्था तसेच यंत्रणांनी महिलांच्या बाजूने उभे राहायला हवे, याचे सूचन करणारे निकाल देत आहे. न्यायालयांची ही सक्रियता स्वागतार्ह आहे. न्यायालयांचे निकाल आले म्हणजे, समाजात लगेच सगळे आलबेल होते, असे नाही. तसे असते तर सामाजिक चळवळींना शतकानुशतके 'दगडावरची पेरणी' करीत राहावे लागले नसते. मात्र, कोणत्याही लोकशाही समाजात न्यायप्रणाली कसे वागते, तिचा झुकाव कोणत्या बाजूला आहे, याला नितांत महत्त्व असते. सर्वोच्च न्यायालयाने ताज्या निकालाने महिलांच्या गर्भपाताच्या आणि त्याच सोबत मातृत्वाच्या अधिकारांचा विस्तार केला आहे. एखादी महिला अविवाहित आहे, एवढ्या एकाच कारणाने तिला गर्भपाताचा अधिकार नाकारता येणार नाही, असा निकाल डॉ. न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने जुलैत दिला होता. त्यानंतर, दोनच आठवड्यांत मद्रास उच्च न्यायालयाने १३ वर्षांची मुलगी २८ आठवड्यांची गर्भवती असताना नेहेमीचे निकष बाजूला ठेवून तिला गर्भपाताची अनुमती दिली होती. तिचे शारीरिक व मानसिक आरोग्य इतर कोणत्याही बाबींपेक्षा मोलाचे आहे, असे न्यायालयाने तेव्हा म्हटले होते. दिल्ली उच्च न्यायालयाचा एक निकाल अधिक स्पष्ट करतानाही सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच 'स्त्रीच्या देहावर केवळ तिचाच अंतिम अधिकार' हे तत्त्व निकालात निःसंदिग्ध शब्दांत नोंदवले होते. कायद्यातील कलमे व तरतुदींचा न्यायमूर्तींनी योग्य त्या परिप्रेक्ष्यात अन्वय लावायला हवा, ही सर्वोच्च न्यायालयाची अपेक्षा चूक नाही. ती त्याच्या अपेक्षा ताज्या निकालात पुरी झाली आहे. या खंडपीठाने 'महिलांचा लैंगिक अधिकार केवळ मूल होऊ देण्यापुरता मर्यादित नाही. आपल्या लैंगिक आरोग्याचाही निर्णय महिलेच्याच हाती हवा,' असे म्हटले आहे. महिलांविषयक देशात जे कायदे आहेत, त्यात अनेकदा महिला कुमारिका आहे, विवाहिता आहे की विधवा आहे, या बाबीला अवास्तव महत्त्व येते. मालमत्ता, वारसाहक्क किंवा आर्थिक लाभांच्या कायद्यांमध्ये ती बाब महत्त्वाची असते. मात्र, कोणत्याही महिलेच्या शारीर अवस्थेबाबत किंवा तिच्या लैंगिक वर्तनाबाबत किंवा गर्भपाताच्या स्वातंत्र्याबाबत तिचे एकटे असणे किंवा विवाहित असणे, या बाबीचा काहीही संबंध नाही, हे अलीकडे न्यायालयांना वारंवार ठासून सांगावे लागले आहे. न्या. चंद्रचूड महिलांच्या या हक्कांबाबत सातत्याने पुरोगामी आणि कालोचित भूमिका घेत आहेत. विवाहित महिलांना तर अनेकदा गर्भधारणा व अपत्यप्राप्तीची सक्ती होते. यावेळी, त्यांच्या शरीरावर असणारा त्यांचा हक्क कुणाच्याही लक्षात नसतो. भारतीय कुटुंब व्यवस्थेचे आणि कौटुंबिक अपेक्षांचे ओझे महिलांचे खासगी आयुष्य आक्रमित करून टाकते. समाजाला याची जाणीवही नसते. भारतीय न्यायालयांनी काही काळापूर्वी 'वैवाहिक जीवनातील बलात्कार' ही संकल्पना मान्य करून तिला अनेक निकालपत्रांमध्ये स्थान दिले. या ताज्या निकालातही खंडपीठाने वैवाहिक जीवनात लैंगिक संबंधांच्या सक्तीमधून अपत्यसंभव होत असेल तर तो थांबविण्याचा अधिकार त्या विवाहित महिलेला आहे, असे म्हटले आहे. न्यायालयांनी इतक्या खासगी बाबी पाहाव्यात का आणि एखाद्या जोडप्याच्या संबंधांची अशी दखल घ्यावी का, अशी टीका मागेही झाली होती. आताही ती होईल. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या निकालात समाजव्यवस्थेसमोर आरसा धरला आहे. 'भारतीय समाजात महिलांचा लैंगिक व इतर छळ तसेच विवाहित महिलेवर होणारा लैंगिक व इतर अन्याय हे वास्तवच आहे,' असे न्यायालयाने नमूद केले आहे. आजही देशातील लक्षावधी महिला तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करीत असतील. न्यायालयाने या मूक बायांच्या वेदनेला या निकालाने वाणी दिली. महिलेचा मातृत्वाचा अधिकार हा एका अर्थाने स्वायत्त असतो. त्याचा संबंध तिच्या वैवाहिक स्थितीशी लावणे, योग्य नाही. ते व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधन घालणारे आहे. मात्र, भारतीय समाजाला इतकी पुढची उडी अद्याप झेपणारी नाही. पण यात उलट्या बाजूने विचार करण्याची गरज आहे. म्हणजे, विवाह बंधनात नसणारी महिला मातृत्व स्वीकारून ती जबाबदारी स्वीकारू शकते. त्याचप्रमाणे, एखादी विवाहिताही 'मला मातृत्व नको' असे म्हणू शकते. ते स्वातंत्र्य तिला आहे. समाज हे स्वातंत्र्य मानत नाही. किंबहुना, विवाहसंस्थेकडे पुनरुत्पादनाचा संभावित मार्ग इतक्याच उथळ अर्थाने पाहणाराही मोठा वर्ग आहे. सर्वोच्च किंवा इतर न्यायालयांचे निकाल हे त्यांच्या समोर आलेल्या त्या त्या खटल्याबाबत असतात. तेथे ते अमलात येतातही. मात्र, हे निकाल साऱ्या समाजाला संबोधित करीत असतात. ते ऐकणे आणि त्याप्रमाणे वागणे, यापासून मात्र भारतीय समाज आजही खूप दूर आहे. त्यासाठी न्यायालयीन निकालांना लोकशिक्षण आणि सामाजिक चळवळींची साथ लागते. तिची आज वानवा आहे.

# विदेशी पाहुण्यांच्या हस्ते एनएमजीकेएस संघटनेच्या नामफलकाचे अनावरण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामगार नेते महेंद्र घरत यांनी कामगार क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले स्थान निर्माण केलेले आहे. भारतीय कामगारांचे प्रश्न व समस्या ते नेहमीच आंतरराष्ट्रीय परिषदेच्या व्यासपीठावर मांडत असतात तसेच परदेशातील कामगारांना मिळणाऱ्या सोयी सुविधा भारतातील कामगारांना मिळवून देण्याचे त्यांचे प्रयत्न असतात, त्यामुळेच स्थानिक कामगारांचा ओढा नेहमीच त्यांच्याकडे वाढत आहे. आयओटीएल धुतुम या कंपनीतील कामगारांनी महेंद्र घरत यांच्या न्यू मॅरीटाईम अॅन्ड जनरल कामगार संघटनेचे नेतृत्व स्विकारले आहे.

संघटनेच्या नामफलकाचे अनावरण दिनांक ३० सप्टेंबर रोजी श्रीलंका, बांग्लादेश, नेपाळ येथील आयटीएफ या बहुराष्ट्रीय संघाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात आले. तत्पूर्वी खढक्र प्रतिनिधींनी बाल्मर लॉरी भेंडखळ व पंजाब कॉनवेअर या सीएफसी ना भेट दिली.

तसेच न्यू मॅरीटाईम अॅन्ड जनरल कामगार संघटनेच्या पनवेल कार्यालयास भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. भारतातील जवळजवळ ७० संघटना आयटीएफ बरोबर संलग्न असतांना आयटीएफ प्रतिनिधी नेहमीच न्यू मॅरीटाईम अॅन्ड जनरल कामगार संघटनेला प्राधान्य देतात हि संघटनेसाठी केलेल्या कामाची पोहोचपावती आहे तसेच संघटनेसाठी अभिमानास्पद आहे.

या कार्यक्रमासाठी कामगार नेते महेंद्र घरत, श्रीलंकेचे सुलानी मेंडीस, जयातीसा, बांग्लादेशचे आलम असिकल, अफसर हुसेन चौधरी, नेपाळचे अजय राय, रुपेश सिकदाल, संजय यादव, राम हरिजन, भाय्याराम प्रसाद, नरेंद्र कार्की, पटनाचे चंद्रप्रकाश सिंग, संगीता गुप्ता, आयटीएफ दिल्लीचे गीथा अय्यर, राजेंद्र गिरी, तसेच न्यू मॅरीटाईम अॅन्ड जनरल कामगार संघटनेचे सर्व पदाधिकारी व मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते.

# रुपेश पाटील यांची युवासेना राष्ट्रीय कार्यकारणीवर नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशाने युवासेनेची राष्ट्रीय कार्यकारणी जाहीर करण्यात आली. ह्या कार्यकारणीत चित्रकार, व्यंग्यचित्रकार, रायगड चे सुपुत्र आणि गेल्या अनेक वर्षे युवासेनेच्या सह सचिव व विस्तारक पदांवर कार्य केलेल्या रुपेश पाटील यांची निवड झाली आहे.



युवासेना रायगड जिल्हा सचिव ते राष्ट्रीय कार्यकारणी हा प्रवास करताना रुपेश पाटील यांनी रायगड- नवी मुंबईतील अनेक महाविद्यालयात ४० हुन जास्त आंदोलने करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला आहे, कॉलेज कक्ष स्थापनेत सुद्धा मोलाचा वाटा आहे.

युवासेनाचे ऑफिसिएल थीम सॉंग (वाघ आला) हे रुपेश पाटील यांनी बनविले आणि ते युवासेनेचे अधिकृत थीम सॉंग म्हूणन गाजले आहे त्याच बरोबर सेनेच्या बाजूने सोशल मीडियावर व्यंग्यचित्रकार म्हणून त्यांनी कार्य केले आहे. त्यांनी काढलेली अनेक व्यंगचित्रे नावाजली गेली आणि महाराष्ट्रभर गाजली गेली. रायगड जिल्ह्याबरोबरच वाशीम व यवतमाळ आणि नगर जिल्ह्यात ३ वर्षे युवासेना विस्तारक (संपर्क प्रमुख) म्हणून त्यांनी काम करून युवासेना वाढवली आहे.

आता शिंदे गट शिवसेनेच्या युवासेना कार्यकारणी मध्ये त्यांना कोकण (रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग) विभाग देण्यात आला असून त्याच बरोबर सोशल मीडिया आयटी सेल ह्याची ही जबाबदारी देण्यात आली आहे. ह्यावेळी रुपेश पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे यांचे आभार मानले आहेत.

# शेल इंडियाच्या कामगारांना दरमहा २३ हजार रुपयांची पगारवाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेल इंडिया एम्प्लॉईज संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदशनाखाली आणि कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली कामगारांना ऐतिहासिक बोनस देणाऱ्या तळोजा औद्योगिक क्षेत्रातील शेल इंडिया मार्केट्स प्रा. लिमिटेड मधील कामगारांच्या पगारवाढीचा व सुविधा देण्याचा करार पार पडला. तीन वर्षांसाठी झालेल्या करारानुसार कामगारांना प्रत्येक महिना २३ हजार रुपयांची भरघोस पगारवाढ करण्यात आली असून याचा ७० कामगारांना फायदा होणार आहे.



या करारानुसार पगारवाढीसोबत कामगारांना ४० हजार रुपये फेस्टिव्हल अडव्हान्स, अपघाती मृत्यू झाल्यास १० लाख रुपये, ०५ लाख रुपयांचा मेडिक्लेम विमा, याशिवाय रजा, शिफ्ट अलाउन्समध्येही वाढ करण्यात आली आहे. तसेच कामगारांसाठी वातानुकूलित बस सेवा, उन्हाळ्याच्या दिवस एनर्जी ड्रिंक, अशाही सुविधा देण्यात येणार आहेत.

यंदाच्यावर्षी दिवाळी बोनस म्हणून प्रत्येक कामगाराला तब्बल ९५ हजार रुपये बोनस मिळणार आहे. विशेष हि बाब येथेच थांबली नाही तर पुढच्या वर्षी ०१ लाख ०५ हजार तर त्याच्या पुढील वर्षी ०१ लाख १५ हजार रुपये कामगारांना बोनस मिळणार आहे. या कराराबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामगारनेते जितेंद्र घरत आणि टीमचे अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

या पगारवाढीच्या करारावर संघटनेच्यावतीने अध्यक्ष जितेंद्र घरत, व्यवस्थापनाच्या वतीने मार्केटिंग व्यवस्थापक गुलशन चौधरी, एच आर व्यवस्थापक शशांक शेखर, उत्पादन निर्मिती व्यवस्थापक सागर करुळकर, कामगार प्रतिनिधी रामदास गोंधळी, सुनिल पाटील, जयराज जाधव, यासिन शेख, अनिल पावशे, सुनिल हरिचंद्रकर, यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी संघटनेच्या कार्यालयीन सचिव समीरा चव्हाण, विनायक मुंबईकर, संघटक विनायक कोरडे, तळोजा एमआयडीसी मधलं डाऊ केमिकल, हायकल, दीपक नायट्रेड, केमस्केप यासह शेल इंडियाचे कामगार उपस्थित होते.

# श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धूपप्रतिबंधक बंधाऱ्यावर ठेवलेले कंटेनर स्टॉल गेले सडून

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरती अंदाजे साडेतीन किलोमीटर लांबीचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यात आलेला आहे. या बंधाऱ्याचे सुशोभीकरण देखील करण्यात आले आहे. २०१९ साली श्रीवर्धनचे तत्कालीन मुख्याधिकारी किरण कुमार मोरे व तत्कालीन नगराध्यक्ष नरेंद्र भुसाणे यांनी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर बांधलेल्या धूपप्रतिबंधक बंधाऱ्यावर भाडेतत्वावर देण्यासाठी कंटेनर स्टॉल ठेवून घेतले. सदर स्टॉल कोणाला भाड्याने द्यायचे व त्याचे भाडे किती असेल याबाबत ठरवण्याचे अधिकार जिल्हाधिकार्यांना असल्यामुळे हे स्टॉल ठेवल्यानंतर वर्षभर तसेच पडून होते. त्यानंतर तीन जून २०२० रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळा मध्ये यातील एक स्टॉल जोरदार वाऱ्याच्या तडाख्यामुळे धूपप्रतिबंधक बंधाऱ्या वरून खाली पडलेला आहे. तीन पावसाळे खाल्ल्यानंतर या स्टॉल ची अवस्था आता पूर्णपणे सडलेली आहे. सदरचे कंटेनर स्टॉल हे खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांना भाडेतत्वावर देण्यात होते. या स्टॉलमध्ये वीज कनेक्शन, त्याचप्रमाणे पाण्याचे कनेक्शन, आत मध्ये ओटा व बेसिन इत्यादी गोष्टी बसविलेल्या होत्या. परंतु आता यातील अनेक वस्तू चोरीला देखील गेल्या असून स्टॉल भंगारात देण्याच्या अवस्थेत आहेत. अनेक स्टॉलची शटर तुटून गेली आहेत. तर वरील पत्रे देखील उडून गेले आहेत. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने सदरचे स्टॉल भंगारवाल्याला देऊन टाकावे व समुद्रकिनारा स्वच्छ दिसेल असे पहावे. हे स्टॉल बसवल्यानंतर वेळीच कुणालातरी दिले असते तर सदरच्या चालकाने त्यांना रंगरंगोटी वगैरे करून ते व्यवस्थित राहिले असते. परंतु जनतेचे लाखो रुपये नगरपरिषदेने कोणतीही कारवाई न केल्यामुळे वाया गेलेले आहेत.

# प्रशासकीय यंत्रणा दिव्यांगांच्या मदतीसाठी सदैव तत्पर : अमित शेडगे

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिव्यांग बांधव समाजातील एक महत्त्वाचा घटक आहे. दिव्यांग बांधवांच्या अडीअडचणीचे निराकरण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सदैव तत्पर आहे असे प्रतिपादन प्रांत अधिकारी अमित शेडगे यांनी केले आहे.

उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे दिव्यांग अस्मिता कार्यक्रमांतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील दिव्यांग बांधवांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी प्रांताधिकारी अमित शेडगे म्हणाले श्रीवर्धन तालुक्यातील दिव्यांगांची संघटना अतिशय उच्च दर्जाची कामगिरी बजावत आहे. आपल्या तालुक्यातील बांधवांना प्रमाणपत्रासाठी अलिबाग या ठिकाणी जावं लागत होतं. मात्र संघटनेच्या प्रयत्नाने डॉक्टरांच्या सहकार्याने आपण आपल्या बांधवांना श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात प्रमाणपत्राचे वितरण करत आहोत. दिव्यांग बांधवांच्या समस्यांचे निराकारण करण्याच्या हेतूने शासनाने विविध उपक्रमाची सुरुवात केली आहे.

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात सर्वत्र विविध उपक्रम तसेच शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. दिव्यांग घटकासाठी राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा सर्वांनी उपयोग करून घ्यावा. प्रशासन दिव्यांग बांधवांच्या सोबत आहे असे अमित शेडगे यांनी सांगितले. सदरच्या शिबिरासाठी प्रांताधिकारी अमित शेडगे यांच्या समवेत तहसीलदार सचिन गोसावी, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. गौतम देसाई, डॉ. शुभम शेळके, डॉ. प्रतिभा फडतरे, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष निलेश नाक्ती तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# म्हसळा पोलीसांनी केली ऑल आऊट ऑपरेशन मोहीम यशस्वी

## अनेक प्रकारचे गुन्हे तपासणी करून ४६०० रुपयांचा दंड केला वसूल

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

तालुका स्तरावरील पोलिस ठाण्याचे हद्दीत होत असलेले छोटे मोठे गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यासाठी आणि या आगोदर झालेले गुन्हे व संबंधीत गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक अशोक दुधे यांचे आदेशाने म्हसळा स. पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी त्यांचे पोलिस ठाण्याचे कर्मचारी व अन्य अधिकारी यांच्या मदतीने ऑल आऊट ऑपरेशन मोहीम सुरू केली आहे.

या मोहिअंतर्गत कारवाई करताना नाकाबंदी दरम्यान ३५ संशयीत वाहनांची तपासणी करून ८ गुन्हे दाखल केले आणि त्यांच्या कडून ४००० रुपयांचा दंड वसूल केला तसेच ३ कोपटा केस करून ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. दिनांक २९ सप्टेंबर २०२२ रोजी सायंकाळी ५ ते रात्रौ ११ वाजताच्या दरम्यान घेण्यात आलेल्या ऑल आउट ऑपरेशन दरम्यान म्हसळा पोलीस ठाण्याकडून हिस्ट्रीशिटर चेक-००,माहितगार आरोपी चेक -०४, हॉटेल चेक -०२, लॉजेस चेक - ०२,संशयीत इसम चेक- १०, दारूबंदी केस -०१, नाकाबंदी दरम्यान वाहने चेक - ३५, नाकाबंदी दरम्यान मोटार वाहन केसेस - ०८,समन्स बजावणी -०२, वॉरंट बजावणी ०४ आणि कोटपा केसेस -३ अशा १५ प्रकारच्या गुन्ह्यांची तपासणी म्हसळा पोलिस ठाणे मार्फत पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी फत्य करत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या बाबीवर लक्ष केंद्रित करुन अनेक प्रकारच्या गुन्ह्यांची माहिती व तपास घेतला असल्याचे सांगण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पत्नीला ठार करून नवऱ्याने गळफास घेऊन आपले जीवन संपवले

ही घटना १० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आल्याने परिसरत एकाच खळबळ उडाली होती, घटनेचे गांभीर्य ओळखून घटनास्थळी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे तर नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, हनुमंत शिंदे, माधुरी मुळीक, यासंह नेरळ पोलीस स्टाफ मोठ्या संख्येने हजर झाला होता.

मयत पूजा ही घरीच राहत होती तर काही दिवसापूर्वी ती घर सोडून गेल्याची तक्रार नेरळ पोलीस ठाण्यात देण्यात आली होती. तर पूजा परत आपल्या घरी आली होती तर मयत पिंटू हा उत्तम वेल्डरची कामे करीत होता परंतु पिंटू हा आपल्या पत्नी पूजावर सारखा संशय घेत असल्याचे पूजेच्या आई कडून सांगण्यात आलं. त्यामुळे या घटनेचा अधिक तपास नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर हे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगरे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळाच्या नवरात्र उत्सवात दिली भेट



**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पनवेल येथे आले असता त्यांनी उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळास भेट दिली व अंबेमातेचे दर्शन घेतले. यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्याचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

महाराष्ट्रात जिओच्या ५ जी सेवा सुरू करण्यासाठी एका कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पनवेल मध्ये आले असता. त्यांनी पोदी येथे असलेल्या सामाजिक कार्यक्रमात द्वारे पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रो उत्सव कार्यक्रमास भेट दिली. यावेळी माता भगिनींनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले. त्यांनतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अंबेमातेचे विधिवत पूजन करून आशीर्वाद घेतले. यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्याचे शाल व श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी त्यांच्यासमवेत भारतीय जनता पार्टी रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे, भाजप प्रदेश ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष व मा.नगरसेवक अॅड मनोज भुजबळ, मा.नगरसेवक प्रकाश बिनेदार, मा.नगरसेवक तेजस कांडपिळे, मा.नगरसेविका सुशीला घरत, मा.नगरसेवक संदीप पाटील, जगदीश घरत, प्रशांत भुजबळ, राकेश भुजबळ, तेजस भुजबळ, अजित लोंढे, पद्मसिंह चव्हाण, सुजित लोंढे, अॅड संकेत भुजबळ, हेमंत भुजबळ, प्रशांत फुलपगार यांच्यासह भुजबळ कुटुंबीय उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## माहिती अधिकार -शंका व समाधान या विषयावरील व्याख्यान संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वतंत्र भारतात नागरिकांना ३० दिवसात उत्तर मिळवून देणारा हा एकमेव कायदा आहे ,ज्याचा वापर जनता प्रशासनाचे कामकाज तपासण्यासाठी करू शकते. याकरिता तुम्हीच तुमचे नगरसेवक आमदार किंवा खासदार बना इतका हा कायदा सक्षम आहे. असे भावपूर्ण उदगार माहिती अधिकार तज्ञ अनिल गलगली यांनी काढले . येथील काँग्रेस भवन सभागृहात जनजागृती ग्राहक मंच रायगड तालुका पनवेल शाखा व पनवेल तालुका निवृत्त सेवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या माहिती अधिकार –शंका व समाधान या विषयावरील व्याख्यानाच्या वेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, मनमोहनसिंग सरकारने केंद्रीय माहिती अधिकार कायदा आणला. २००५ ते २०१० पर्यंत हा कायदा प्रभावी होता. त्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांना हा कायदा अडचणीचा वाटू लागल्याने त्यांनी माहिती आयुक्तांची नेमणूक करण्यास चालढकल केली. तथापि सततच्या पाठपुराव्याने व वरिष्ठ पातळीवर तक्रारी करून माहिती प्राप्त करून घेता येते. त्या माहितीच्या आधारे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासंबंधी अर्ज करता येतो .तसेच दप्तर दिरंगाई कायदा व सेवा कायद्याचा देखील आधार घेता येतो . श्री गलगली यांनी कायद्याच्या तरतुदी विश्लेषण करून सांगितल्या. अर्जाचा तपशील, प्रथम व द्वितीय अपील बाबतच्या तरतुदी याबाबत त्यांनी सविस्तर विवेचन केले . शेवटी त्यांनी सांगितले की प्रत्येकाने एक तरी माहितीच्या अधिकाराचा अर्ज करावा .दिवसातून दहा मिनिटे वेळ काढून गव्हर्मेंट साइटवर जाऊन विविध विभागाचे सुधारित आदेशाचे अवलोकन करावे. तुम्ही सर्वजण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष करदाते आहात. तेव्हा तुमच्या हक्काविषयी तुम्ही जागृत असायला हवे. श्रोत्यांच्या प्रश्नांना श्री गलगली यांनी समपक उत्तरे देऊन श्रोत्यांचे शंका समाधान केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक जनजागृती ग्राहक मंचाचे सचिव बी.पी. मात्रे सर यांनी केले .वक्त्यांचा परिचय तसेच स्वागत संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय गायकर तर आभार प्रदर्शन शिवदास पालकर यांनी केले. प्रमुख उपस्थिती रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्रीकांत पाटील यांची होती. 'जनजागृती ग्राहक मंच पनवेल तालुका 'चे उपाध्यक्ष सुभाष फडके ,जन जागृती ग्राहक मंच रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील वैद्य , जिल्हा सचिव नितीन पाटील ,जिल्हा सदस्य संतोष विचारे ,निवृत्त सेवक मंडळाच्या सुनंदा पाटील, चौक चे यशवंत सकपाळ जनजागृती ग्राहक मंच रसायनी शाखेचे अध्यक्ष संदीप पाटील व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. रमेश चव्हाण व राजकुमार ताकमोगे यांच्या सहित इतर अनेक अनाम कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठीविशेष परिश्रम घेतले.

# उरण तालुक्यातील आदिशक्ती मातेची मंदिरे बनली भाविकांचे श्रद्धास्थान

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहर तसेच ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये नवरात्रौत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जातो. या नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून अनेक भाविक आप आपल्या कुटुंबासह ग्रामदैवताच्या व देवी मातेच्या दर्शनासाठी मंदिरात ये–जा करताना दिसत आहेत. सध्या हि मंदिरे भाविकांची श्रद्धास्थाने बनली आहेत.

शारदीय नवरात्र हा देवी दुर्गा मातेच्या सन्मानार्थ साजरा केला जाणारा एक वार्षिक सण आहे. हा सण देशातील विविध ठिकाणच्या देवीच्या मंदिरात किंवा देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना, घटस्थापना करून नवरात्रौत्सव म्हणून मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. उरण तालुक्यात ही नवरात्रौत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. सध्या तालुक्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या १) जसखार गावची ग्रामदेवता श्री रत्नेश्र्वरी देवी, २) फुंडे गावची ग्रामदेवता श्री घुरबादेवी, ३) नवीन शेवा गावची ग्रामदेवता श्री शांतेश्र्वरी देवी, ४) डोंगरी गावची ग्रामदेवता श्री अंबादेवी, ५) उरण देऊळ वाडीची ग्रामदेवता श्री उरणावंती – शीतला देवी, ६) करंजा गावची ग्रामदेवता श्री द्रोणागिरी देवी, ७) मोरा कोळीवाडा गावची ग्रामदेवता श्री एकवीरा





देवी, ८) नागावची ग्रामदेवता श्री मांगिन देवी, ९) चिरनेर गावची ग्रामदेवता श्री गावदेवी माता, १०)





कोप्रोली गावची ग्रामदेवता श्री वज्रेश्वरी देवी, ११) कोटगावची ग्रामदेवता श्री जरी मरी देवी, १२) बोरखार गावची ग्रामदेवता श्री गावदेवी, १३) कंळबुसरे गावची ग्रामदेवता श्री इंद्रायणी एकवीरा देवी मंदिरात ही मोठ्या भक्तिभावाने नवरात्रौत्सव सण साजरा केला जात आहे.

या नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून तालुक्यातील तसेच इतर शहरातील, ग्रामीण भागातील भाविक मोठ्या भक्तिभावाने देवीच्या दर्शनासाठी मंदिरात आप आपल्या कुटुंबासह ये–जा करत असल्याचे चित्र मंदिर परिसरात पाहायला मिळत आहे.

यावेळी सुहासिनी महिला आपल्या ग्रामदैवत असलेल्या श्री देवीची खणा नारळानी ओटी भरत आहे. त्यामुळे हि मंदिरे भाविकांची श्रद्धास्थाने बनली असून मंदिर परिसराला सध्या जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

## सहदेव कापसे यांचा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने गौरव

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील वरसगाव गावचे सुपुत्र तथा सेवानिवृत्त आदर्श शिक्षक सहदेव कापसे यांचा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने विशेष गौरव करण्यात आला आहे.

अविष्कार सोशल व एज्युकेशनल फाउंडेशन कोल्हापूर, अविष्कार फाउंडेशन रायगड जिल्हा यांच्या वतीने त्यांचा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रम जिल्ह्यातील श्रीवर्धन या ठिकाणी संपन्न करण्यात आला. रायगड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, विद्यमान आमदार आदिती तटकरे यांच्या हस्ते व आविष्कार फाऊंडेशनचे संस्थापक–अध्यक्ष संजय पवार,जिल्हाध्यक्ष संदीप नागे, कार्यक्रमाचे अध्यक्ष रवींद्र चौधरी पाटील,अविष्कार फाऊंडेशनचे तालुका अध्यक्ष प्रकाश कंठाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या संस्थेमार्फत दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा–या मान्यवरांना सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून गौरविण्यात येत आहे.तर सहदेव कापसे यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

## मूर्ती चालल्या मूर्तिकारांकडे ; शुन्य प्रदूषणाचा अभूतपूर्व उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेशमूर्ती पूजनानंतर, घरच्या घरी विसर्जन करून, उरलेली माती मूर्तिकारांना परत देऊन शून्य प्रदूषणाचा अभूतपूर्व उपक्रम खारघर, कामोठे, सुकापूर, पनवेल, नवीन पनवेल व करंजाडे येथील पनवेल वैस्ट वॉरियर्सनी २९ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमात घनश्याम पाटील, गौरी काशीकर, प्रल्हाद बोडके, तनय दीक्षित, विनोद शिंगण व वृषाली म्हात्रे यांनी कृतीतून जनजागृतीची मुहूर्तमेढ रोवली. मूर्तिकारांचा आर्थिक फायदा, पर्यावरण संरक्षण व मूर्तीच्या मातीतून परत देवाच्या मूर्ती घडून पवित्र व अध्यात्मिक लाभ अशी त्रिसूत्री असलेला कार्यक्रम गणेश शिंदे, प्रतिक्षा महाडिक, राजीव अधिकारी व तुषार लेले यांनी भक्तिभावाने साजरा केला.



प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पाण्यात लवकर न विरघळल्याने, मूर्तीचे अवयव भंगतात. मोठाले तुकडे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे आणून प्रवाह तुंबतात. त्याचबरोबर जलस्त्रोतांची गढूळता, ऍसिडिटी, उष्णता व क्षारता वाढते. पाण्यातील ऑक्सिजन कमी होतो. प्रकाश कमी मिळाल्याने प्रकाश संश्लेषणात अडथळे येतात. मूर्तीच्या सिंथेटिक रंगातील जड व विषारी धातू पाणवनस्पती व मास्यांमधून अन्नसाखळीत प्रवेश करतात. विसर्जनानंतर कृत्रिम तलावातून काढलेले डेब्रीस हे देखील प्रचंड मृदा प्रदूषण करते.

दरवर्षी मूर्ती विसर्जनाचा आकडा २० करोडच्या घरात जातो. पनवेल वैस्ट वॉरियर्सनी या परिस्थितीचा अभ्यास केला. काळाची गरज ओळ–खून मूर्ती घरच्याघरी विसर्जनानंतर राहिलेली मातीत मूर्तिकारांना भेट देऊन अनेक दुष्परिणाम थांबवण्याचा पायंडा पाडला. दगड, धातू वा मातीची मूर्ती हे पर्याय देखील डोळस नागरिकांपुढे आहेत. सार्वजनिक ठिकाणी गर्दी व वाहतूक कोंडी न करता, शून्य डेब्रीस, शून्य प्रदूषण व शून्य खर्चाचा हा उपक्रम लवकरच सर्वत्र करण्याचा मानस पनवेल वैस्ट वॉरियर्सच्या प्राजक्ता शाह व त्यांच्या सहकाऱ्यांचा असल्याचे त्यांनी सांगितले.

# हाळ खुर्द ग्रामपंचायत येथे मतदारांची नावे नोंदणी व दुरुस्ती शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । खोपोली**



खालापूर तहसिल कार्यालयाच्या सहकार्याने तसेच हाळ खुर्द ग्रामपंचायतच्या मागणीनुसार आज गुरुवार दि.२९ सप्टेंबर २०२२ रोजी नवीन मतदारांची नावे नोंदणी, दुरुस्ती मतदार यादीत डबल असलेली नावे कमी करणे, मयत व लग्न झालेल्यांची मतदान यादीतून नाव कमी करण्याकरिता हाळ खुर्द ग्रामपंचायतच्या सभागृहात शिबिराचे (कॅम्प) आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये गावातील जेष्ठ नागरिकांसह तरुणांनी सहभाग नोंदविला. तसेच युवा मतदारांनी येणाऱ्या आगामी ग्रामपंचायत निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी हाळ खुर्द ग्रामपंचायत कडून परीसरात मतदार नोंदणी अभियान राबविन्यात आले.यादी भाग क्र. २२९ हाळ खुर्द –१मध्ये फार्म नं.८ चे ३२ तर फार्म नं.६ चे १४ तसेच यादी भाग क्र.२३० हाळ खुर्द –२ मध्ये फार्म.६ बी चे २, फार्म.८चे ३२,फार्म.६ चे ३० फार्म भरण्यात आले. नवीन मतदार नावे नोंदणी व मतदार नाव पत्ता दुरुस्ती शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.

मतदार यादीतील तपशीलाशी आधार क्रमांक जोडण्याबाबत अधिकारी वर्गाकडून जनजागृती करण्यात आली असून वोटर हेल्पलाइन प द्वारे आधार क्रमांक ऑनलाइन करून घेण्या संदर्भात या वेळी नागरिकांना मार्गदर्शन ही करण्यात आले. सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत शिबीर (कॅम्प) सुरू होते. अतिशय चांगल्या प्रकारे नागरिकांनी नवीन मतदार नावे नोंदणी व दुरुस्ती करून घेतल्याने या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाले.

यावेळी या शिबिरासाठी राज्यश्री जोगी नायब तहसीलदार महसूल खा–लापूर, सचिन वाघ मंडल अधिकारी खोपोली, रणजीत कवडे तलाठी कांढरोली,प्रतीक बापडेकर तलाठी, अरबीना जळगांवकर बी. एल. ओ. यादी क्रमांक २३० हाळ खुर्द,जलालुद्दीन सांगरे बी. एल. ओ. यादी क्रमांक २२९ हाळ खुर्द, सुरेश ठोंबरे कोतवाल, अरुण हातमोडे कोतवाल, नरेंद्र लेखणीक हाळ खुर्द ग्रामपंचायत, अजीम अस्लम करजीकर, गुलजार जळगावकर, यांसह जेष्ठ नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फडके विद्यालयात सामाजिक भोंडल्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवरात्रोत्सवाच्या दिवसांत पारंपरिक पद्धतीने हस्त नक्षत्राची पूजा करण्याचा खेळ म्हणजे भोंडला! नवीन पनवेल येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयातील माध्यमिक विभाग मराठी माध्यमातर्फे सामाजिक भोंडल्याचे आयोजन करण्यात आले होते.

पारंपरिक पोशाखातील मुलींनी हत्तीच्या आकृतीभोवती फेर धरत पारंपरिक भोंडल्याच्या गाण्यावर ठेका धरला. समाज व शाळा यांच्यातील अनुबंध अधिक दृढ करण्यासाठी सामाजिक भोंडल्याचे औचित्य साधून कोरोना संकटात विद्यालयातील गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणाऱ्या पालकांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना पर्यवेक्षिका समिता सोमण म्हणाल्या की, या विद्यालयात शिक्षण घेवून विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांकडून आजी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. पोलीस, अग्निशामक दल, डॉक्टर, परिचारिका, समाजसेविका, विद्यार्थ्यांना बस सेवा देणारे, लघुउद्योजिका, तसेच आर्थिक पाठबळ देणाऱ्यांचा सन्मान याप्रसंगी करण्यात आला.

## रजपे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संगीता घुडे यांची बिनविरोध निवड

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील रजपे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संगीता हरीश घुडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून सरपंच दिपाली पाटील पिंगळे यांनी काम पाहिले. भाग्यश्री घरत, दर्शना निलधे, कलुबाई बागारी, मनीषा फाले, संतोष निलधे, गजानन शिद आदी सदस्य यावेळी उपस्थित होते.

नवनिर्वाचित उपसरपंच संगीता घुडे यांना शुभेच्छा देण्यासाठी माजी आमदार सुरेश लाड, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, गटनेते शरद लाड, भूषण पेमारे, राष्ट्रवादीच्या महिला अध्यक्षा रंजना धुळे, जिल्हा परिषद सदस्य रेखा दिसले, उकरूळच्या सरपंच वंदना थोरवे, बोरिवलीच्या सरपंच वृषाली क्षीरसागर, स्मिता घुडे, अशोक सावंत,बळीराम देशमुख, प्रमोद पिंगळे, जगदीश देशमुख, कैलास घारे, केतन बेलोसे, हरेश घुडे, राजन क्षीरसागर, योगेश क्षीरसागर, भास्कर दिसले, जय बोराडे, ऋषिकेश राणे, श्यामकांत पाटील, तसेच रजपे ग्रामपंचायतमधील सर्व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाविक भक्तांचे श्रद्धास्थान सारडे येथील कोमनादेवी

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात उरण तालुक्याच्या पुर्व विभागात सारडे गावात कोमनादेवी (ऊँवळपरींशी: १८ओ५०'०उत्तर ७३ओ०'२७पूर्व ) ही एक स्थान देवता असुन ती पाषाण रूपात पुजली जाते. हे देऊळ उरण शहरापासुन ८ कि.मी. अंतरावर आहे. देवीची कोणतीही मुर्ती नसुन एक लहान पाषाण आहे. हे स्थान सारडे गावात असुन त्याच्या पुर्व दिशेला असलेल्या कोमनादेवी डोंगरावर वसलेले आहे. पिरकोन,पाले गावाच्या दक्षिणेला आहे. येथे पुर्वी दाट झाडी होती १९९० नंतर हळूहळू ती कमि झाली . सारडे गावात ही देवता पुजनीय असुन पिरकोन आणि पंचक्रोशित सुद्धा वंदनीय आहे. सध्या २०१५ मध्ये येथे विद्युतवाहिनीचे खांबांद्वारे येथे विज आली आहे. बहुतेक सर्व व्यवस्था सारडे गावकीकडे किंवा ग्रामपंचायतिकडे आहे. पावसाळ्यात आठवडा अखेरीस हे स्थान आणि टेकडी पर्यटक आणि स्थानिक तरुणाईने बहरलेले असते, सुर्यास्ताच्यावेळी येथुन उरण मधिल द्रोणागिरी डोंगराच्या पलीकडे सोनेरी प्रकाशांत दक्षिण मुंबई दिसते ,तसेच पावसाळ्यामध्ये काळ्या मेघांमधुन ही मुंबईचे दर्शन होते,तर सायंकाळी विद्युतप्रकाशात चमचमणारे उरण परिसर दिसतो. पावसाळ्यात येथे तरुणाई आणि किशोरवयीन मुले फुटबॉल खेळण्यात व्यस्त असतात. विशेष असा रस्ता अजुन बनविला नाही आहे,अजुन पायवाटेनेच येथे पोहचता येते. येथे विविध पाषाणांनी ही देवता व्याप्त आहे.ह्या पाषाणांत देखिल देवतांचे अंश आहेत असे मानले जाते

गावातील 'जय मल्हार' या सामाजिक संस्थेद्वारे गावकऱ्यांच्या सहकार्याने स्टिलचे खांब आणि शेड चढवुन या स्थानाची शोभा वाढविली आहे. घोलाच्या पश्चिमेला' कोमनादेवी डोंगरावर' 'कोमनादेवी' प्रगट झाली आहे जी पाषाण रूपात येथे निवास करते. गावाच्या आख्यायिकेनुसार देवी पिरकोन गावातील एका भक्ताच्या स्वप्नात आली होती तिने स्वप्नांत दृष्टांत देऊन सांगितले मला मुक्त राहु दे .त्यामुळे तेथे अजुन मंदिर बांधले गेले नाही,परंतु सारडे पिरकोन गावातिल भक्तांसाठी तिचे महत्त्व अपरंपार आहे.येथे येणारे पर्यटक देवीचे दर्शन जरुर घेतात.हि देवता येथे प्रचंड प्रिय असुन तिच्या रिक्षा चालक गणेश म्हात्रे या भक्तांनी स्वतःच्या वाहनांवर कोमनादेवी प्रसन्न हे तिच्या कृपेचे प्रतिक म्हणुन लिहिले आहे.

'सारडे विकास मंच' या सामाजिक संघटनेमधुन नागेंद्र म्हात्रे,गोपाळ म्हात्रे आणि मंगेश पाटिल आणि 'एन बॉय्स' या लहान मुलांच्या ग्रुपने येथे स्वच्छता मोहिम राबऊन येथिल परीसर स्वच्छ केला आहे.गावातील स्वप्निल पाटिल आणि सुशांत माळी यांनी सारडे गावची श्री कोमनादेवी,श्री राधाकृष्ण आणि श्री हनुमान यांना समर्पित ध्वनिमुद्रिका 'नटखट कान्हा' ह्या गावातिल ग्रुप तर्फे बनविली आहे.समुद्र सपाटी पासून १०० मीटर उंच असलेल्या कोमनादेवी हे भाविक भक्तांचे महत्वाचे धार्मिक केंद्र बनले आहे.

सोनवलकर साहेब

अॅड.रेणुका पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.९८३/२०२२

ने.ता.१७/१०/२०२२

श्री.मच्छिंद्र तुकाराम नाईक — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

कारणे जाहीर नोटीस देण्यात येते की, ज्याअर्थी कै.बच्चीबाई चांग्या नाईक यांचे निधन दि.०८/०३/१९७८ रोजी मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झाले होते. परंतु कै.बच्चीबाई चांग्या नाईक यांच्या मृत्यूची नोंद पनवेल महानगरपालिका यांच्याकडील मृत्यू नोंदणी अभिलेखात झालेली नाही. त्याचे मृत्यूच्या नोंदणीसाठी अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदरच्या अर्जास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या न्यायालयात स्वतः अगर आपले वकीलांमार्फत १ महिन्याचे आत आपली हरकत नोंदवावी. उक्त मुदतीत हरकत न आल्यास कोणासही याबाबत हरकत देण्याची नाही असे समजून हे न्यायालय वरील अर्जदार यांचा पुढील पुरावा घेवून नोंद घालण्याचा हुकूम करील याची नोंद घ्यावी.

आज दि.३० माहे सप्टेंबर २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे सही–शिक्क्यानिशी दिली आहे.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

मा.ए.एस.सोनवलकर साो

अर्जदारातर्फे वकील

अॅड.गुरुनाथ दत्ता भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साो.वर्ग १ यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज नं.१०६०/२०२२

नि.नं.७

ने.ता.०३/११/२०२२

श्रीमती.सुनिता सुभाष जाधव
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.केएल–४/६६/५ बी, से.४ ई, कळंबोली नोड,
पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८
मो.नं.८६५२७७७८८९ — अर्जदार

विरुद्ध

निबंधक जन्म मृत्यू नोंदणी
नावडे विभाग
महानगरपालिका पनवेल
नावडे गाव, पो.नावडे, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन–४१०२१८ — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांच्या मुलीचा कुमारी मंजू सुभाष जाधव जन्म दि.३०/०६/२००९ रोजी मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. तशी मृत्यूची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.१०६०/२०२२ दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदाराचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : ०१/१०/२०२२

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

